# प्रकरण पहिले

# 'समिधा' आणि आजचे दलित साहित्य

## प्रकरण पहिले

# ''समिधा आणि आजचे दलित साहित्य''

**प्रास्ताविक**

**१. 'समिधा' शब्दाचा अर्थ**

**२. दलित साहित्याच्या व्याख्या व स्वरुप**

२.१ 'दलित' शब्दाचा अर्थ

२.२ 'दलित' शब्दाच्या व्याख्या

२.३ 'दलित' साहित्याच्या व्याख्या

२.४ 'दलित' साहित्याचे स्वरुप

२.५ 'दलित' साहित्याची वैशिष्ट्ये

**३. 'दलित' साहित्याची वाटचाल**

३.१ 'दलित' कविता

३.२ 'दलित' कथा

३.३ 'दलित' कादंबरी

३.४ 'दलित' नाटक

३.५ 'दलित' आत्मकथने

३.६ 'दलित' वैचारिक लेखन

**४. 'समिधा' आणि आजचे दलित साहित्य**

४.१ 'समिधा' या कादंबरी लेखनामागील प्रेरणा

४.२ 'समिधा' या कादंबरीचे आजच्या दलित साहित्यातील स्थान

**समारोप**

-----

## प्रकरण पहिले

## “ ‘समिधा’ आणि आजचे दलित साहित्य”

### प्रास्ताविक

१९६० नंतर मराठी साहित्यात वेगवेगळे वाङ्मयीन प्रवाह निर्माण झाले. त्यामध्ये महानुभावीय साहित्य, संत साहित्य, पंडिती साहित्य, लोकसाहित्य, स्त्रीवादी साहित्य, तौलनिक साहित्य, ग्रामीण साहित्य असे विविध प्रकारचे वाङ्मयीन प्रवाह स्वातंत्र्यपूर्वकाळातच अस्तित्त्वात होते. परंतु दलित साहित्य हा वाङ्मय प्रवाह स्वातंत्र्यपूर्व काळात उदयास आला असला तरी त्याची खऱ्या अर्थाने वाटचाल ही स्वातंत्र्योत्तर काळातच झाल्याचे दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’ हा संदेश आणि त्यांच्या चळवळी व आंदोलने या गोष्टींमुळे त्यांच्या जीवनात होणारा बदल, दलित पँथरची चळवळ या सर्वांमुळे त्यांच्या मनामध्ये विद्रोहाची भावना जागृत झाली. इतर प्रस्थापित धर्मांनी घालून दिलेल्या रूढी, परंपरा यांना त्यांनी नाकारले तसेच मनुष्य म्हणून जगण्याचे हक्क व स्वातंत्र्य आपल्याला मिळाले पाहिजे. तसेच सर्वांना समतेची वागणूक मिळाली पाहिजे, या गोष्टीतून स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय व आत्मभान ही मूल्ये स्वीकारुन वेदना, विद्रोह नकार ह्या प्रेरणेतून दलित साहित्याची निर्मिती झाली.

दलित साहित्यात लेखकांनी आत्मकथा हा वाङ्मयप्रकार मोठ्या प्रमाणात हाताळला. परंतु सुरुवातीच्या कालखंडात कथा, नाटक, कादंबरी ह्या प्रकारापेक्षा कविता हा वाङ्मय प्रकार जोमाने पुढे आल्याचे दिसून येते.

दलित साहित्यामध्ये जसे दलित लेखकांनी लेखन केले त्याचप्रमाणे दलितेतर लेखकांनीही लेखन केले आहे. परंतु दलित लेखकांचे लेखन हे अनुभवातून प्रत्येक घटना-प्रसंग त्यांच्या आयुष्यात जे घडले, त्यांनी जे सोसले-भोगले ते जिवंत अनुभव त्यांच्या साहित्यातून प्रकट होत गेले आणि दलितेतर लेखकांनी मात्र जे दलितांविषयी लिहिले ते दुरुन पाहून, ऐकून त्यांच्याविषयी वाटणाऱ्या सहानुभूतीतून लेखन केले.

दलित साहित्यात स्वातंत्र्योत्तर काळात जो कादंबरी हा वाङ्मय प्रकार हाताळला तो मर्यादित प्रमाणात होता.

'समिधा' ही रणजित देसाई यांनी लिहिलेली दलितांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी एक घटनाप्रधान ग्रामीण व दलित सीमारेषेवरील कादंबरी आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये आजच्या दलित साहित्यामध्ये 'समिधा'चे स्थान काय आहे याचा अभ्यास करावयाचा आहे.

## १) 'समिधा' शब्दाचा अर्थ

'समिधा' - 'होमाच्या उपयोगाचे इंधन'[१] असा अर्थ विस्तारित शब्दकोशामध्ये आहे. आदर्श मराठी शब्दकोशामध्ये 'समिध' या शब्दाचा अर्थ 'होमास उपयोगी उंबर, पिंपळ, खैर वगैरे लाकडाचा तुकडा'[२] असा आहे. तसेच सरस्वती शब्दकोशामध्ये 'समिधा' शब्दाचा अर्थ 'होमात ज्यांची आहुती द्यावयाची ते काष्ठ, सर्पन, इंधन'[३] असा आहे. अशा प्रकारे 'समिधा' या शब्दाचे अर्थ मराठी शब्दकोशामध्ये आले आहेत. त्याच पद्धतीचे हिन्दी शब्दकोशातील 'समिधा' या शब्दाचे अर्थ पाहताना, 'नालन्दा विशाल शब्दसागर' या हिन्दी शब्दकोशात

'समिधा' म्हणजे 'आग जलाने की लकडी', यज्ञकुंड में जलाने की लकडी ।[४] असा आहे. तसेच प्रामाणिक हिन्दी कोशामध्ये 'समिधा'चाअर्थ 'हवनकुंड में जलाने की लकडी ।'[५] असा आहे. तर इंग्रजी शब्दकोशामध्ये 'समिधा' शब्दाचा अर्थ "A stic of a Span in length of Butea fronclosa, Mimosa catched and other pure trees (to be used to kinding sacrifical or sucred fire)[6] असा आहे.

अशा प्रकारचे 'समिधा' या शब्दाचे मराठी, हिन्दी आणि इंग्रजी शब्दकोशामध्ये अर्थ असलेले दिसून येतात.

रणजित देसाई यांनी 'समिधा' या पुस्तकाच्या सुरुवातीच्या पानावर 'समिधा' म्हणजे 'यज्ञ संपन्न होण्यासाठी होमामध्ये जी पवित्र काष्ठे टाकली जातात त्यांना 'समिधा' असे म्हटले आहे.

'समिधा' ही कादंबरी अभ्यासल्यानंतर मला असे वाटते की, 'समिधा' हे रणजित देसाई यांनी या कादंबरीला दिलेले नाव योग्य आहे. या कादंबरीत दलित आणि सवर्ण यांच्या संघर्षामध्ये दलितांची काहीही चूक नसताना ते या संघर्षाच्या होमामध्ये लाकडाप्रमाणे जळून खाक होतात हे मांडल्याचे दिसून येते.

## २) दलित साहित्याच्या व्याख्या व स्वरुप :

### २.१ दलित शब्दाचा अर्थ :

१९३३ च्या भारत सरकारने जो जातीय निवाडा जाहीर केला त्यात 'डिप्रेस्ड क्लासेस' असा शब्दप्रयोग केला. त्याचे मराठीकरण 'पददलित' असे होते. प्रत्यक्षात 'पददलित' हा शब्द दलित ह्याच अर्थाने वापरला गेला. ह्याच दरम्यान

भारतात जी समाजवादी विचारधारा पुढे आली त्या विचारसरणीत आर्थिक व सामाजिकदृष्ट्या जे वर्ग दडपले होते, ज्यांचे आर्थिक शोषण होत होते त्या वर्गांना महत्त्व प्राप्त झाले. म्हणूनच या दृष्टीने 'जो दळला गेलेला आहे, भरडला गेलेला आहे तो दलित' या अर्थाने दलित हा शब्द पुढे आला.

श्री.म. माटे यांनी 'अस्पृष्ट' हा शब्द तयार केला. सत्यनारायणाचे पुरस्कर्ते 'निर्भिड'कार अनंत हरी गद्रे 'पूर्वास्पृश्य' हा शब्द वापरीत. गांधीजींनी 'हरिजन' हा शब्द वापरला. या शब्दावरून 'गिरिजन', परिजन हे शब्द वापरले गेले. डॉ. आंबेडकरांनी 'बहिष्कृत' हा शब्द वापरला. त्यांच्या वृत्तपत्राला त्यांनी हेच नाव दिले आहे. ऋग्वेदामध्ये दलित शब्दाला 'शूद्र' शब्द आला आहे.

## २.२ 'दलित' शब्दाच्या व्याख्या :

'दलित' हा शब्द विसाव्या शतकात रुढ झाला. बाबुराव बागुल दलित साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना म्हणतात, ''दलित म्हणजे वर्णव्यवस्थेला आणि तिच्या समग्र वैचारिक व्यवस्थेला उद्ध्वस्त करू बघणारा, दलित म्हणजे हे जग व जीवन नव्याने मांडू बघणारा.''[७]

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी –**

''दलित हा मानवी प्रगतीत सर्वात मागे पडलेला आणि रेटलेला वर्ग आहे.''[८]

**केशव मेश्राम –**

''दलित हा शब्दच स्फोटक आहे. महान संस्कृतीचे गोडवे गाणारी समाजव्यवस्था तिने स्वीकारलेले धर्म व ईश्वर ही भयस्थाने त्यांना सहाय्यभूत होणारी

चातुर्वण्यव्यवस्था तिच्यातून निर्माण झालेले जन्माधारित वंशश्रेष्ठत्व अशा या काटेरी साखळीत फार मोठा समाज तिरस्कृत ठरला गेला. त्यामुळे उद्घोष मानवतेचा असला तरी कृत्य अमानवीपणाचे, चर्चा बंधुत्त्वाची पण वागणूक शत्रूत्वाची, मूल्य समानतेचे पण पद्धती विषमतेची अशा दाहक अनुभवातून पिळवटल्या गेलेल्या माणसांच्या अनंत दु:ख अपेक्षांना, प्रतिकाराच्या हुंकाराला मूल्य व अस्मितेच्या शोधाला दलित शब्द प्रेरक ठरला आहे.''[९]

**नामदेव ढसाळ –**

''दलित म्हणजे अनुसुचित जातीजमाती, बौद्ध कष्टकरी जनता, कामगार, भूमिहीन, शेतमजूर, गरीब शेतकरी, भटक्याजमाती, आदिवासी.''[१०]

**सदा कऱ्हाडे –**

''आर्थिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या मिळून एक सर्वसमावेशक दलित वर्ग मानता येईल. त्यात कामगार, शेतमजूर, उपजिविकेसाठी श्रमणारे आणि अस्पृश्यही येतील. ज्यांची पिळवणूक होते ते दलित.''[११]

या व्याख्यांमध्ये प्रा. केशव मेश्राम व नामदेव ढसाळ यांच्या व्याख्या इतर व्याख्यापेक्षा व्यापक वाटतात. कारण या व्याख्यांमध्ये जाती-जमाति बरोबर संस्कृती यांचा समावेश केल्याचे दिसून येते.

## २.३ दलित साहित्याच्या व्याख्या :

**म.ना. वानखेडे –**

''दलित साहित्य हे दलित लेखकांनी दलितांविषयी निर्माण केलेले प्रक्षोभक विद्रोही साहित्य म्हणजे दलित सहित्य होय.''[१२]

**बाबुराव बागुल –**

"माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे, माणसाला महान मानणारे, वंश, वर्ण आणि जाती श्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य ते दलित साहित्य होय."[१३]

**त्र्यं.वि. सरदेशमुख –**

"दलित जीवनाचे दर्शन देणारे, दलितांच्या विचार भावना प्रकटविणारे, दलितांनीच लिहिलेले साहित्य म्हणजे दलित साहित्य होय."[१४]

**केशव मेश्राम –**

"हजारो वर्षे ज्यांच्यावर अन्याय झाला अशा अस्पृश्यांना दलित म्हटले व त्याच वर्गातील लेखकांनी निर्माण केलेले साहित्य म्हणजे दलित साहित्य होय."[१५]

**प्रा. शरदचंद्र मुक्तिबोध –**

"दलित असणे आणि दलित जाणीव असणे यात फरक आहे. जीवनविषयक जे वाङ्मय निर्माण होते ते दलित वाङ्मय होय."[१६]

**प्र.श्री. नेरुरकर –**

"प्रत्यक्ष जीवन अनुभव घेणाऱ्या दलित वर्गातील साहित्यिकांनी केलेला प्रक्षोभ व विद्रोही अविष्कार म्हणजे दलित साहित्य."[१७]

**म.भि. चिटणीस –**

"दलित वर्ग हा एक भारताचा पुराण, मूक आणि अदृश्य पुरुष होता आणि त्याचा अनुभव आज वाङ्मयीन रुप घेत आहे. हा सगळा संदर्भ दलित शब्दाला द्यावा लागेल."[१८]

**डॉ. म.बा. ग्रामोपाध्ये –**

“चीड, संताप, बंडखोरी प्रवृत्तीची काही लक्षणे या वृत्तीचा कलात्मक अविष्कार म्हणजे दलित साहित्य.”[१९]

**डॉ. गंगाधर पानतावणे –**

“दलित साहित्याची चळवळ हा एक मुक्तिसंग्राम आहे. स्वत:ला शोधण्याचा तो एक प्रभावी प्रयत्न आहे. अशी त्रिज्या रेखाटली जाते त्यास दलित साहित्य म्हणावे.”[२०]

**राजा ढाले –**

“जो जो या समाजरचनेविरूद्ध आणि सांस्कृतिक व्यवहाररचनेविरूद्ध लढण्याचा दृष्टिकोन होऊन साहित्याची निर्मिती करेल आणि वाट चुकलेल्या समाजाला वाटेवर आणेल तो दलित साहित्यिक असेल आणि त्याचे साहित्य म्हणजे दलित साहित्य होय.”[२१]

**नरहर कुरुंदकर –**

“प्रत्येक माणसाला स्वातंत्र्य, प्रतिष्ठा आणि भितीशून्य सुरक्षितता मिळाली पाहिजे. अशी भूमिका झालेली एक जीवनदृष्टी वाङ्मयात अभिव्यक्त होत आहे. त्याला मी दलित साहित्य मानतो.”[२३]

दलित साहित्याचा खोलातून विचार करणारे वरील अभिप्राय व मूल, मौलिक विचारातून एक विशेष गोष्ट लक्षात येते ती म्हणजे ह्या व्याख्या दलित माणसाच्या भोवती गुंफलेल्या आहेत. त्याला केंद्रबिंदू मानून केल्या आहेत. या सर्व व्याख्यातून असे जाणवते की दलित माणसाचे आजपर्यंत झालेले अवमूल्यन, ते

घडविणाऱ्या परंपरा, समाजरचना याविरूद्ध विद्रोह पुकारुन त्या माणसाचे प्रतिष्ठेचे व माणुसकीचे मूल्य प्रस्थापित करण्यासाठी लढण्याची प्रेरणा देणारा त्यांची अस्मिता जागविणारा, त्यांची स्वप्ने पल्लवित करणारा गती व प्रगतीवान असा एक विचार भावना, संवेदनांचा उदात्त हुंकार म्हणजे दलित साहित्य होय.

या व्याख्यातून ज्यांच्याविषयी लिहावयाचे ते दलित जीवन होते. ज्यामुळे माणसाला दलितत्व प्राप्त झाले त्या संस्कृती, समाजव्यवस्थेविरूद्ध विद्रोह, नकार आदी येतो तो व्यक्त होतो. दु:ख, चीड, संताप, प्रक्षोभ, विकार, भावना, वेदना, संवेदना या त्यांच्या अविष्कारातून दलित साहित्य साकाताना दिसते.

## २.४ दलित साहित्याचे स्वरुप :

साहित्य हे समाजजीवनाचे प्रमुख अंग आहे. साहित्यात संस्कृतीचे प्रतिबिंब पडते. जशी संस्कृती तसे साहित्य असे विधान करण्यात येते. मानवी संस्कृतीबरोबर साहित्याचे स्वरूप पूर्णत: बदलत आहे. सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याची शक्ती साहित्यात आहे. दलित साहित्याचे स्वरुप इतर मराठी साहित्यापेक्षा वेगळे आहे. दलित साहित्यातील कविता, कथा, नाटक, निबंध इ. वाङ्मय प्रकार नव्या जाणिवांनी प्रकट झाले आहेत. त्यामुळे त्यांचे स्वरुप प्रस्थापित साहित्यापेक्षा समतेच्या अनुभूतीचे संवेदनविश्व घेऊन प्रकटले आहे.

दलित साहित्य हे प्रस्थापित शोषण व्यवस्थेविरूद्ध आपल्या कलाकृतीतून विद्रोह व्यक्त करीत आहे. अस्पृश्यता, जातीयता व दैन्य या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक अन्यायाला मूठमाती देण्यासाठी शब्दांचे शस्त्र म्हणून उपयोग करीत आहे. गावकुसाबाहेरील जगलेले जीवन बेभानपणे शब्दातून मांडत आहेत. सवर्णांकडून होणारा अन्याय कथा-कादंबरीतून व्यक्त करीत आहेत. पिण्याच्या

पाण्यासाठी माणूसपण नाकारलेल्या हिंदू धर्म परंपराविरूद्ध समतेचा आविष्कार नाटकातून उदयास आला. आजपर्यंतच्या मराठी कलाकृतीतून जे जीवन उभे राहिले नाही ते दलित साहित्यिक निर्भिडपणे मांडत आहेत. आपल्या अनुभवांना कथा-कादंबरीतून साहित्यरुप देताना दिसतात. दलित कवितेत हजारो वर्षांची व्याकूळ वेदना विद्रोही होऊन प्रकट झाली. शोषण व्यवस्थेला नकार देऊन जन्मास आली. दलित निबंधातील वैचारिकता बदलत्या समाजाचे विश्लेषण मांडत जन्मावर उच्च-नीचता आधारलेल्या तत्त्वज्ञानावर हल्ले करीत जन्मली. दलित स्वकथने स्वत:च्या वास्तव जीवनात भोगलेले जीवन मांडू लागली. सामाजिक अस्पृश्यतेने होणारा माणसांचा अपमान उकलून दाखवू लागली.

एकूण दलित साहित्यापेक्षा मराठी साहित्याची प्रवृत्ती वेगळी असल्याने दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र आशयसंपन्न मूल्याने आकारास येत आहे. हे सबंध साहित्य क्रांती जाणिवांनी प्रकट झाल्यामुळे त्याने जसे वाङ्मयात परिवर्तन आणले आहे, त्याचप्रमाणे त्याला समाजजीवनातही अमूलाग्र बदल हवा आहे. त्यामुळे त्याला सामाजिक मूल्यतत्त्वाचे संदर्भ प्राप्त झाले आहेत. याबाबतीत बाबुराव बागुल म्हणतात, "दलित साहित्य हे समाजोन्मुख समाजाशी अंतर्बाह्य निगडीत झालेले व समाजाची संपूर्ण बांधिलकी स्वीकारणारे मानवनिष्ठ व समाजनिष्ठ साहित्य आहे."[२४]

अशा प्रकारे दलित साहित्याने हिंदू संस्कृतीला नाकारल्यामुळे मराठी साहित्यापेक्षा त्याची प्रवृत्ती भिन्न असल्याचे दिसून येते. त्याने बुद्धीवादी, विज्ञानवादी दृष्टी स्वीकारल्यामुळे मराठी साहित्यापेक्षा त्याला निराळेपण प्राप्त झाले आहे.

दलित साहित्यातील जीवन अनुभवविश्व, जाणिवा, वैचारिकता, भाषा, अभिव्यक्ती हे समग्र घटक मराठी साहित्यापेक्षा स्वतंत्र रुप घेऊन आले आहेत. त्यामुळे पारंपरिक साहित्यापेक्षा दलित साहित्याचे स्वरुप निराळे दिसून येते. या निराळेपणातूनच दलित साहित्याचे स्वरुप सिद्ध होते.

## २.५ दलित साहित्याची वैशिष्ट्ये :

१) दलित साहित्याच्या प्रेरणास्थानी गौतमबुद्ध, महात्मा ज्योतिराव फुले, कार्ल मार्क्स आणि मुख्य म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आहेत.

२) बौद्ध तत्त्वज्ञान बुद्धीवाद आणि विज्ञाननिष्ठा यांच्या कसोटीवर आधारलेले असल्याचे दिसून येते.

३) दलित साहित्याच्या निर्मितीमागील प्रेरणा व दलित साहित्याचे स्वरुप यांत भावनाभिव्यक्तीला स्थान नसून विचार प्रकटनाला महत्त्व असल्याचे निदर्शनास येते.

४) डॉ. आंबेडकरांनी स्वीकारलेली मार्क्सची विचारसरणी.

५) दलित साहित्य माणसाला केंद्रबिंदू मानताना दिसून येते.

६) जोतिबा फुले यांनी समता, बंधुत्वाचा पुरस्कार केला. तसेच हिंदु धर्मातील मानसिक व सामाजिक गुलामगिरीविरूद्ध बंड केले.

७) दलित साहित्य जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था, हिंदू रुढी-परंपरा, चालीरिती यांच्याविरूद्ध बंड पुकारते.

८) मानवमुक्ती, स्वतंत्रता, समता, बंधुता व न्याय यांचा पुरस्कार तसेच आंबेडकरांनी दलितांच्या मनात आत्मसन्मान, आत्मविश्वास, आत्मावलंबन यांची जाणीव करून दिली.

९) जो धर्म माणसाला वर्तमान समृद्ध करण्यासाठी प्रोत्साहन देतो. तो त्याच्या मनात आशा पल्लवित करतो व फुलवितो तोच खरा धर्म होय. ज्या धर्मात माणसाच्या विकासाला वाव नाही, तो धर्म नसून ढोंग आहे.

१०) आंबेडकरी विचाराचा गाभा लोकशाही, समाजवाद आणि बुद्धविचारप्रणाली हे असल्याचे दिसून येते.

११) सम्यक क्रांती होण्यासाठी विद्रोहाची गरज आहे. माणसाच्या शत्रुशी, माणसाला कमी लेखणाऱ्या व्यवस्थेविरूद्ध विद्रोह केलेला दिसून येतो.

१२) दलित साहित्याची बांधिलकी मनुष्यत्वाची प्रतिष्ठा मानणाऱ्या तत्त्वप्रणालीशी आहे.

१३) दलित साहित्याने वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था नाकारुन माणूस महान आहे. हे सूत्र मानले.

अशाप्रकारची वैशिष्ट्ये दलित साहित्याची दिसून येतात. यावरून दलित साहित्याचे स्वरुप व वेगळेपण दिसून येते.

## ३. दलित साहित्याची वाटचाल :

दलित साहित्याला स्वत:ची अशी परंपरा नाही. त्यामुळे सुरवातीच्या काळात मध्यमवर्गीयांच्या साहित्याचा नमुना दलित साहित्यिकांपुढे होता. किसन फागुजी बनसोडे (बंदसोडे) (१८७९ ते १९४६) यांच्या समोर केशवसुतांनी लिहिलेल्या 'तुतारी' या कवितेचा नमुना होता. हे लक्षात येते. दलित कथेचे 'आद्यजनक' मानले जाणारे बंधु माधव, फडके खांडेकरांच्या कथांच्या रचनाबंधाचे अनुकरण करत होते. हरी नारायण आपटे यांच्या काळापासून सत् आणि असत् पक्ष असे विरूध्द संघर्षाचे एक स्थूल असे रूप आपल्याला लक्षात येते. आण्णा भाऊ

साठे यांच्या कादंबऱ्या संघर्षाचे रूप प्रत्ययाला येते. दलित साहित्याला डॉ. आंबेडकर यांच्या तत्वविचारांचे अधिष्ठान असल्याने दलित कथा, कादंबरी, दलित नाटक या ललित साहित्य प्रकारांना वैचारिकतेचे परिमाण असल्याचे दिसून येते. या दलित-ललित साहित्याबरोबर दलित वैचारिक वाङ्मय विपुल प्रमाणात निर्माण झाल्याचे दिसून येते. प्रस्थापित मराठी साहित्यात जे निबंध वाङ्मय निर्माण झाले आहे तेवढेच स्थान दलित वैचारिक वाङ्मयाचे अन्वर्थक आहे. दलित साहित्य हे वाङ्मय प्रकारांच्या अंगाने विकसित झाले आहे.

अनेक प्रतिभावंत कलावंतानी आपल्या सर्जनशील निर्मितीद्वारे या वाङ्मय प्रकारांना विकसित करून 'दलित साहित्याला' मराठीतील एका नव्या प्रवाहाचा दर्जा मिळवून दिला आहे व मराठी वाङ्मयाच्या कक्षा विस्तृत व समृद्ध केल्या आहेत. हे वाङ्मय प्रकार आपआपल्या परीने विकसित होत आहेत.

दलित साहित्य हे स्वातंत्र्यपूर्व काळात जरी उदयास आले असले तरी त्याची खऱ्या अर्थाने वाटचाल ही स्वातंत्र्योत्तर काळातच झाली. दलित साहित्य हे १९६० नंतरच्या कालखंडात नावारुपाला आल्याचे दिसून येते.

## ३.१ दलित कविता :

दलित साहित्यातील एक महत्त्वाचा आणि प्रभावी वाङ्मयप्रकार म्हणजे दलित कविता. दलित लेखकांनी आपले दु:ख, भावना मोजक्या शब्दात व्यक्त करण्यासाठी कविता हा वाङ्मय प्रकार निवडला. कविता हा वाङ्मयप्रकार वाचकांच्या डोक्यात चटकन भरण्यासारखा असल्यामुळे या दलितकाव्याने मराठी काव्याला समृद्ध केले आहे.

दलित साहित्यामध्ये विद्रोही जाणीव प्रथम कवितेतूनच झालेली दिसते. विस्तृत आशय स्पष्ट करण्यासाठी लघुत्तम आकाराचे 'कविता' हे माध्यम दलित विद्रोही कलावंताला सहजोपयोगी ठरले. डॉ. शत्रुघ्न जाधव दलित कवितेबाबत म्हणतात की, "युगायुगांच्या अन्याय अत्याचाराच्या कचाट्यात सापडलेले व त्या भयंकर गुलामीच्या गुहेतून बाहेर पडू इच्छिणारे दलित मन अत्यंत संतप्तपणे आपला विद्रोही हुंकार व आपली वेदना कवितेतून मांडू लागले."[२५] यावरून दलित कवितेचे स्वरुप दिसून येते.

दलितांच्या दुःखाचा हुंकार हा कवितेतून प्रकट झाला. प्रस्थापित कवितेतून गावकुसाबाहेरचे जीवन दिसले नाही. परंतु दलित कवीला त्याची जाणीव झाली आणि त्यांनी आपली दुःखे वेशीवर टांगली. सोवळेपणा, प्रतिष्ठा, ईश्वरनिष्ठा, लाजलज्जा बाजूला सारुन दलित कवी आपली दुःखे परखडपणे मांडू लागला. आंबेडकरांचे विचार खेड्या-पाड्यात पोहोचवण्याचे काम करू लागला. डॉ. सदा कऱ्हाडे दलित कवितेबाबत म्हणतात की, दलित कविता स्वातंत्र्योत्तर कालीन वैफल्यातून निर्माण झालेली असली तरी दलित कविता केवळ अन्याय-अत्याचाराबद्दल आणि व्यथा वेदनाबद्दल आक्रोश करीत नाही. प्रारंभीच उल्लेखल्याप्रमाणे ती प्रकाशयुगात प्रवेश करणारी कविता असल्यामुळे आपल्या समाजाच्या उज्ज्वल भवितव्याचे स्वप्नंही दलित कविता रेखाटते.

दलित कवींपैकी नारायण सुर्वे, शाहिर अमरशेख, नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, वामन निंबाळकर, दया पवार, त्र्यंबक सपकाळे, ज.वी. पवार, उमाकांत रणधीर, अरुण कांबळे, रमाकांत जाधव, प्रकाश जाधव, निलाकांत जाधव, प्रल्हाद चेंदवणकर, अर्जुन डांगळे, रविचंद्र हडसणकर, बबन चहादे, दामोदर मोठे, मीना

गजभिये, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, मल्लिका अमरशेख, भिमसेन देठे, बी. रंगराव, प्रज्ञा लोखंडे, भगवान सवाई, अरुणकुमार इंगळे, अशोक पाटील इत्यादी. याशिवाय आणखीही नवीन कवी निर्माण होत आहेत.

## ३.२ दलित कथा :

मराठी लोकजीवनात आणखी एक स्थित्यंतर घडून आले ते म्हणजे, १९६० नंतर दलित साहित्याचे मराठी साहित्यातील साचलेपण कमी करून त्याला नवीन अशी दिशा देण्याचे काम आज दलित साहित्य करीत आहे. म्हणून दलित लेखकाने लिहिलेल्या कथा या एकूण मराठी कथेची व्याप्ती वाढवत आहेत.

कवितेप्रमाणेच लोकांना प्रिय असणारा दलित साहित्यातील एक वाङ्मयप्रकार म्हणजे कथा होय. दलित जीवनानुभव घेताना जेव्हा विद्रोह निर्माण होतो, तेव्हा त्याला नाट्यात्मक रुप प्राप्त होते. त्यातूनच 'दलित कथा' सहज जन्म घेते. दलित कथेमध्ये शहरी व ग्रार्मीण अशा दोन्ही पातळीवर भोगाव्या लागणाऱ्या यातना, दारिद्रय, उपासमार, सवर्णांकडून होणारे अन्याय-अत्याचार दलितांवरील जातीयवादातून होणारे हल्ले, अस्पृश्यता व बहिष्काराची वागणूक इत्यादी जीवनविषय कथाबद्ध केलेले आहेत. दलितांतील ब्राह्मणीकरण दलित चळवळीतील राजकारण, पक्षविघटन, नामांतर चळवळ, बौद्ध संस्कृतीचा अवलंब इत्यादी गोष्टींची अंतर्मुख होवून कलात्मक दर्शन दलित कथेने घडविले आहे. दलित कथा सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक, मनोवैज्ञानिक आणि प्रेमविषयक जाणिवेच्या अनुभूतीतून साकार झाल्याचे दिसून येते.

दलित कथेची जडण-घडण बंधुमाधव, आण्णाभाऊ साठे व शंकरराव खरात यांच्याकडून झाली म्हणून त्यांना दलित कथेच्या जडण-घडणीचे शिल्पकार म्हणतात.

मराठी साहित्यामध्ये जेव्हा ग्रामीण कथेचा प्रवास सुरु झाला तेव्हापासूनच दलित कथेला सुरवात झाली. दलित कथेचे तीन टप्पे मानले जातात. १) १९३० ते १९५६, २) १९५६ ते १९८०, ३) १९८० नंतर. त्यापैकी पहिला टप्पा आंबेडकरकालीन असून त्यामध्ये बधुमाधव हे प्रमुख कथालेखक आहेत. तर, दुसऱ्या कालखंडात बाबुराव बागुल आणि तिसऱ्या कालखंडात प्रा. केशव मेश्राम व वामन होवाळ यांचा निर्देष करता येईल.पहिल्या टप्प्याच्या शेवटी व दुसऱ्या टप्प्याच्या सुरुवातीच्या काळात आण्णा भाऊ साठे आणि शंकरराव खरात कथालेखन करीत होते. तसेच, बाबुराव बागुल यांचा 'विद्रोही दलित कथेचे जनक' असा उल्लेख केला जातो. १९५८ मध्ये मुंबई येथे भि.सी. कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली संम्मेलन झाले. आण्णा भाऊ साठे हे त्याचे उद्‌घाटक होते. १९६० नंतर एकूनच सामाजिक,सांस्कृतिक पर्यावरणातील स्थितीगती झपाट्याने बदलू लागली. दलित साहित्याचा प्रवाह ठळक होवू लागला.

श्री.म. माटे यांचे 'उपेक्षितांचे अंतरंग' आणि 'माणुसकीचा गहिवर' हे दलित जीवनावरचे कथासंग्रह आहेत. परंतु आजच्या दलित कथा ह्या मानसिक व शारीरिक छळाचे, दैन्यावस्थेचे चित्र रेखाटतात. एकीकडे नकार व दुसरीकडे स्वीकार यातील द्वंद्व, दलित कथा अचुकपणे टिपते. स्वातंत्र्योत्तर काळात १९५० नंतर ग्रामीण लेखकांच्या बरोबरीने दलित लेखक कथा लिहित होते. त्यामध्ये आण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, ना.रा. शेंडे, बंधुमाधव, बाबुराव बागुल,

योगीराज वाघमारे, वामन होवाळ, भिमराव शिरवाळे, भास्कर चंदनशिवे, योगेंद्र मेश्राम यांनी काही कथा लिहिल्या आहेत. दलित कथा म्हणावी तितकी विकास पावलेली दिसत नाही.

दलित लेखिकांमध्ये उर्मिला पवार यांचे 'सहावे बोट' (१९८८) आणि 'चौथी भिंत' (१९९०) हे कथासंग्रह आहेत. दलित स्त्रियांच्या कथालेखनाबाबत डॉ. सदा कऱ्हाडे म्हणतात की, ''दलित स्त्री ही 'स्त्री' आणि 'दलित' अशा दोन्ही नात्यांनी दुखावलेली आणि गुलामगिरीने ग्रासलेली आहे. ती जेव्हा आपल्या काळजातले कढ भाषिक रचनाद्वारे व्यक्त करते तेव्हा, सकस आणि सुजाण साहित्य जन्मास येते.''[२६]

अशाप्रकारे दलित साहित्यामध्ये कथा ह्या वाङ्मय प्रकाराचे स्वरुप व वाटचाल लक्षात येते.

## ३.३ दलित कादंबरी :

एकूणच दलित साहित्यात कादंबरी हा वाङ्मय प्रकार अत्यंत मर्यादित प्रमाणात हाताळल्याचे दिसून येते. दलित कादंबरी जोमाने अशी विकसित झालेली दिसत नाही. याबाबत डॉ. शत्रुघ्न जाधव म्हणतात की, ''दलित विद्रोही जाणिवेच्या अभिव्यक्तीसाठी कादंबरीसारखा मोठा आवाका असलेला व अनेक व्यक्तीपात्र, समुदायांचा विस्तृत पट सामावू शकणारा पण काहीसा पसरट असा वाङ्मयप्रकार दलित कलावंताना गैरसोयीचा वाटत असावा.''[२७] दलित कादंबरी लेखन दलित तसेच काही दलितेतर लेखकांनीही केले आहे, त्यामध्ये जे दलित लेखकाने कादंबरी लेखन केले ते अनुभवातून व जाणिवेतून केले आहे. तर

दलितेतरांनी ज्या दलित कादंबऱ्या लिहिल्या त्या दलितांविषयी वाटणाऱ्या सहानुभूतीतून लिहिल्या असल्याचे दिसते.

दलित कादंबरीचा विचार करताना आण्णा भाऊ साठे यांच्यापासून करावा लागतो. आण्णा भाऊनी एकूण ३५ कादंबऱ्यातून उपेक्षित जीवनातील माणसाच्या मनातील स्वाभिमान जागविला, त्याला धीट केला, त्याच्यामध्ये चेतना निर्माण केली. शंकरराव खरांतानी धर्मांतरावर 'माणुसकीची हाक' ही कादंबरी 'मसालेदार हाऊस', 'गावचा टिनोपॉल गुरुजी' या कादंबऱ्या लिहिल्या खरातांचा पिंड हा कादंबरीपेक्षा कथाकाराचा होता हे स्पष्ट होते. दलित कादंबरीचे स्वरुप कलात्मकदृष्ट्या अप्रगल्भ असेल, परंतु सामाजिक आशयाच्या प्राधान्यतेने दलित साहित्यक्षेत्रात दलित कादंबरी वाढ करणारी ठरली. कादंबरी लेखनामध्ये दलित लेखक, आण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागुल, बंधुमाधव, केशव मेश्राम, उत्तम बंडू तुपे, माधव कोंडविलकर, हरीभाऊ पगारे, सुधाकर गायकवाड, विजय शिरसट, यशवंत मनोहर इत्यादी लेखकांचा समावेश होतो. तसेच अरुण साधु, मधु मंगेश कर्णिक, जयवंत कर्णिक, राजन गवस आणि रणजित देसाई अशा काही दलितेतर लेखकांनी दलितांच्या जीवनावर कादंबरी लेखन केले आहे. दलित कादंबरीबाबत प्रकाश खरात म्हणतात की, "दलित कादंबरीमधून व्यक्त होणारी सामाजिक जाणीव व सौंदर्य दलितांच्या जगण्या-मरणातून साकारले आहे."[२८]

खरातांच्या या संदर्भातून दलित कादंबरीचे स्वरुप लक्षात येते. परंतु दलित कादंबरी मर्यादित राहण्याचे कारण सांगताना डॉ. सदा कऱ्हाडे म्हणतात की, "दलित साहित्यात कादंबरी लेखन धिमेपणाने झाले, त्याला आणखी एक कारण दलितांच्या मानसिकतेत आहे."[२९] यावरून दलित लेखकांची कादंबरी

लिहिण्याची मानसिकता त्यांच्यामध्ये नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे कांदबरी हा वाङ्मयप्रकार दलित लेखकांनी मर्यादित ठेवला आहे.

## ३.४ दलित नाटक :

दलित नाटक व दलित रंगभूमीला म्हणावी तशी स्वतंत्र परंपरा वाङ्मयीन इतिहासात आढळत नसली तरी, सत्यशोधकी, आंबेडकरी जलशांपासून दलित नाटकांची परंपरा शोधावी लागेल. दलित रंगभूमीचे शिल्पकार म.भि. चिटणीस यांना आपल्या समाजप्रबोधनासाठी दलित रंगभूमीची प्रकर्षाने गरज वाटत होती. ते म्हणतात की, ''अभावग्रस्त समाजाला रंगभूमी हा आधार आहे. आत्मशोधनासाठी आणि जाणीव जागृतीसाठी''[३०] म्हणूनच त्यांनी या गरजेपोटी 'युगयात्रा' हे नाटक लिहून दलित नाटकाची पायाभरणी केली. तसेच तमाशा, वगनाट्य व प्रहसन इत्यादी माध्यमातून किसन फागुजी बनसोडे यांनी ही दलित रंगभूमी गाजविली. केरुबुवा गायकवाड यांनी दलित जागृतीसाठी वगनाट्य लिहिले. तरीही दलित विषय घेवून कांही दलितेतर लेखकांनी दलित नाटके लिहिली आहेत.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर एक-एक नाटककार पुढे येवू लागला. त्यामध्ये प्रभाकर गणवीर यांचे 'नोकरीच्या जाळ्यात', सुरेश वंजारी यांचे 'मृत्युपत्र', गंगाधर पानतावणे यांचे 'माणूसकीचे बंड', कमलाकर डहाट यांचे 'नखळी', प्रभाकर दुफाळे यांचे 'जयक्रांती' इत्यादी नाटके तसेच दलित एकांकिका ज्या सादर केल्या त्यामध्ये हेमंत खोब्रागडे यांचे 'सुर्यास्त', प्रेमानंद गज्वी यांचे 'घोटभर पाणी', दत्ता भगत यांचे 'वाटा-पळवाटा' व भि.शी. शिंदे यांचे 'भूमीपुत्र' इत्यादी नाटककारांनी मराठी नाट्य वाङ्मयात मोलाची भर घातली आहे. दलित जीवनातील सर्व अंगाचे दु:ख त्यांनी नाटकातून मांडलेले दिसते.

दलित नाटक, एकांकिका, आशय आणि अभिव्यक्तीतून क्रांतीकारक निर्मितीचा पुरावा देवून मराठी रंगभूमीचे मापदंड बदलायला भाग पडले. समस्याप्रधान आशय कल्पकतेतून साकार करण्याचा यशस्वी प्रयत्न या कलावंतानी केलेला आहे. त्यामध्ये टेक्सास गायकवाड, अविनाश डोळस, प्रभाकर दुपारे, अमर रामटेके, इ.मो. नारनवरे यांचा समावेश होतो. तसेच आपल्या प्रतिभा सामर्थ्याने सामाजिक, विद्रोही आशयाला नाट्यरुप देण्याचे काम प्रेमानंद चव्हाण, गज्वी, रामनाथ, संजय जिवने, श्रीरंग सुखे, प्रकाश त्रिभुवन इत्यादींनी केले आहे. यावरून दलित नाटकाच्या वाटचालीचे स्वरुप लक्षात येते.

वाङ्मयीनदृष्ट्या पाहिले तर नाटकांच्या विविध प्रकारात शोकनाट्य हा सर्वोत्कृष्ट प्रकार मानला जातो. एकूण मराठी प्रस्थापित साहित्यात देखील सर्वोत्कृष्ट म्हणता येईल असे शोकनाट्य गंभीर प्रवृत्तीचे नाट्य असते. त्यामध्ये मानवाच्या गंभीर स्वभाव आणि गंभीर कृतीची अनुकृती असते. भय आणि करुणा या दोन गोष्टी एकत्र येवून मानवी मनाचे उन्नयन करण्याचे सामर्थ्य शोकनाट्यात असते. वास्तविक पाहिले तर दलितांचे जीवनानुभव हा शोकनाट्य निर्मितीला अनुकूल असा अनुभव विषय आहे. तमाशा या वाङ्मय प्रकारात नवा आशय प्राप्त होण्यासाठी शोकनाट्याचे नवे रुप दलित नाटक देवू शकेल.

कथा, कादंबरी, नाटक या तीन वाङ्मय प्रकाराचा म्हणावा तितका विकास झाला नाही. दलित साहित्यामध्ये त्याची प्रगती होणे गरजेचे आहे.

## ३.५ दलित आत्मकथने :

मराठी साहित्याचे मौलिक धन म्हणजे 'दलित आत्मकथन' होय. एक प्रभावी वाङ्मयप्रकार म्हणून दलित आत्मकथा प्रतिष्ठा पावली आहे. दलितांनी

आपल्या आयुष्यात जे भोगलं, सोसलं आणि जे जगलं तोच त्यांच्या साहित्याचा विषय झाला. त्यातूनचं दलित आत्मकथा निर्माण झाली. दलित आत्मकथनामध्ये जे समाजजीवन चित्रित झाले ते मराठी साहित्याने कधीच चितारले नव्हते. भयानक व चित्तथरारक जीवन आणि वास्तविक जगलेलं विश्व या आत्मकथनातून प्रकट झाल्याने मराठी वाचक रसिक आणि समीक्षक बिचकून गेलेले दिसून येतात. दलित आत्मकथनातून लेखकांचे स्वानुभाव व त्याच्या कटु जाणीवा व्यक्त झालेल्या आहेत. दलित कलावंताने जे भागले, सोसले व अनुभवले जे आहे, ते जसेच्या तसे प्रांजळपणे शब्दात मांडले. दलित आत्मकथनांच्या बाबतीत डॉ. शत्रुघ्न जाधव म्हणतात की, ''आत्मप्रत्ययाचे विराट रुप वेदना व अश्रूंनी किती पार भिजलेले आहे, जगण्यातील दैन्य, लाचारी, दास्य, अस्पृश्यता यांचा पीळ किती मग्रुर पण घट्ट आहे याचे जळजळीत चित्रण दलित आत्मकथनात पाहायला मिळते. हे जिवंत वास्तव व प्रामाणिक जीवनगाथा मराठीत व्यक्त झाल्याने मराठी साहित्यालाच जिवंतपणा प्राप्त झाला आहे.''[३१] डॉ. शत्रुघ्न जाधव यांच्या या संवादावरून दलित आत्मकथनाचे मराठी साहित्यातील असणारे स्थान लक्षात येते.

दलित आत्मकथनांना मराठी वाङ्मयात परंपरा नसली तरी आत्मकथनाचे बिज मात्र मिलिंद महाविद्यालयाच्या १९६४ च्या वार्षिक अंकात सापडते. 'वाटाड्या' नावाचा प्र.इ. सोनकांबळे यांचा एक लेख वार्षिक अंकात छापला होता. तो आत्मपर होता. त्यात त्यांनी आपल्या जीवनातल्या खडतर आठवणी सांगितल्या होत्या. त्यातूनच पुढे 'आठवणींचे पक्षी' हे आत्मकथनपर पुस्तक तयार झाले. या पुस्तकाअगोदर दया पवार यांचं 'बलुतं' प्रकाशित झालं होतं. या आत्मकथनाला फारच प्रसिद्धी मिळाली होती. असा आत्मकथा हा प्रकार उदयास आला. दलित

लेखक आपले वास्तव जीवन जगासमोर मांडू लागले. आपल्या दु:खाचे दर्शन त्यांनी या आत्मकथनातून घडविले. यामध्ये शंकरराव खरात, यांचे 'तराळ-अंतराळ', प्र.ई. सोनकांबळे यांचे 'आठवणींचे पक्षी', दया पवार यांचे 'बलुतं', केशव मेश्राम यांचे 'हकिकत आणि जटायू', माधव कोंडविलकर यांचे 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे', गंगाधर पाणतावणे 'पाटी आणि पोळी', उत्तम बंडु तुपे 'काट्यावरची पोटं', मुक्ता सर्वगोड 'मिटलेली कवाडे', रुस्तुम अचलखांब 'गावकी', पार्थ पोळके 'आभरान', शरणकुमार लिंबाळे 'अक्करमाशी', श्रीरंग तलवारे 'धुळपाटी', प्रा. तुषार भाग्यवान 'कौडाळ', ल.स. शेकडे 'झळा', शांताबाई कांबळे 'माझ्या जल्माची चित्तरकथा', बेबी कांबळे 'जिणं आमुचं', लक्ष्मण माने 'उपरा', लक्ष्मण गायकवाड 'उचल्या', ना.म. शिंदे 'जातीला जात वैरी', किशोर शांताबाई काळे 'कोल्हाट्याचं पारं', वैजनाथ कळसे 'ऐरणीच्या घणा', प्रल्हाद चेंदवणकर 'टाच',गजुबाई गावीत 'आदोर', गौतम कवाळे 'बावळट', आर.के. त्रिभुवन 'द दान सुटे गिरान', रतनलाल सोनाग्रा 'सोनजातक' इ.

दलित आत्मकथनात 'मी' केंद्रस्थानी असल्यामुळे 'मी'च्या जीवनातील 'घटनांची' मालिका त्यात असते. 'मी'ला कराव्या लागणाऱ्या संघर्षाचा इतिहास त्यात असतो. परंतु प्रकट करण्याची पद्धत इतिहासासारखी नसून मानसशास्त्रीय असते. आत्मकथनकार हे हजारो वर्षांच्या दलित परंपरेचे वारस आहेत. तसेच डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेने गेल्या अर्धशतकात दलितांच्या मानसिकतेत जो बदल झाला, शिक्षण सुधारणा आणि आधुनिकता यांचा जो प्रकाश त्यांना दिसला त्यांचेही ते वारस आहेत. दलित लेखक आपल्या बदलत्या मानसिकतेनुसार गतजीवनातले अनुभव कथन करतात. त्यामुळे त्यांच्या अनुभवात वर्तमानकाळातील ताजेपणाचा

आभास होतो. म्हणून आत्मकथने ही इतिहासासारखी न वाटता कादंबरीसारखी वाटतात.

आत्मकथन आणि आत्मचरित्र यामध्ये फरक दिसून येतो. आत्मकथनामध्ये लेखक स्वत:चे अनुभव सांगत असताना काहीही गुपित गोष्टी न लपविता त्या प्रांजळपणे आपल्या लेखनातून मांडत असतो. परंतु आत्मचरित्र लिहित असताना मात्र लेखकाला तटस्थ भूमिका घ्यावी लागते. दलित समाजाने जे भोगले ते तटस्थपणे सांगता येणे शक्य व संभाव्य नसते. म्हणून डॉ. सदा कऱ्हाडे आपल्या 'दलित साहित्याची चिकित्सा' या पुस्तकात म्हणतात की, दलित आत्मकथने ही सुयोग्य अशा आत्मचरित्राच्या पातळीवर कधीच जावू शकत नाहीत. कारण ती प्रामुख्याने कथेच्या रुपात सांगितली जातात. तेही गरजेचे असते. कारण स्वानुभव सांगताना ज्यांच्यामुळे हे अनुभव घेणे भाग पडले त्यांची चरित्रता डोकावत असते.

अशाप्रकारे दलित साहित्यामध्ये दलित आत्मकथनांची संख्या जास्त असल्याने एकूण मराठी साहित्यामध्ये दलित साहित्याला मोलाचे स्थान मिळवून देण्याचे काम हे दलित आत्मकथनाने केले आहे.

## ३.६ दलित वैचारिक लेखन :

दलित साहित्याला वैचारिक लेखनाची परंपरा फार मोठी आणि प्रगल्भ असल्याची दिसून येते. या लेखनाच्या प्रेरणेतूनच दलित साहित्याला चालना मिळाली. दलित, अस्पृश्य आदिवासी आणि संस्कृतीपासून दुर्लक्षित असणाऱ्या समाजघटकांना वैचारिक लेखनाने त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली आणि स्वत:च्या उद्धारासाठी लढण्यास प्रवृत्त केले. विषमव्यवस्थेविरूद्ध लढण्याचे तत्त्वज्ञान ही वैचारिक लेखनानेच दिले. या वैचारिक लेखनाचा परिणाम असा झाला की, जो

दळला, भरडला गेलेला आहे तो शूद्र, दलित आज हक्कासाठी लढत आहे आणि साहित्य, कला, राजकारण व समाजकारण या सर्व क्षेत्रात तो दलित, अस्पृश्य सर्वांच्या बरोबरीने सामील झाला आहे.

डॉ. बाबासाहेबांच्या निबंधलेखनापासून या दलित साहित्यिकांना वैचारिक निबंधलेखनाला प्रेरणा मिळाली. तिथूनच फुले-आंबेडकरी विचार समाजामध्ये पेरण्याचे काम हे वैचारिक लेखनानेच केले आहे. भारतातील 'पहिला विद्रोही निबंधकार' म्हणून म. फुले यांचा उल्लेख केला जातो. त्यांनी ब्राह्मणांचे कसब, 'शेतकऱ्यांचा आसूड', 'गुलामगिरी', 'सार्वजनिक सत्यधर्म' इ. मौलिक ग्रंथातून दलितांच्या प्रश्नांना वाचा फोडली.

डॉ. आंबेडकरांनी म. फुले यांना गुरु मानले आणि डॉ. आंबेडकर हे 'दलितांच्या मुक्तिसंग्रामाचे शिल्पकार' त्यांनी 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता', 'समता' व 'प्रबुद्ध भारत' या पत्रकातून वैचारिक निबंधलेखन केले. या लेखनातून अस्पृश्यांना त्यांच्या गुलामगिरीची जाणीव करून देऊन त्यांची अस्मिता जागी केली.

म. फुलेंच्यानंतर किसन फागुजी बनसोडे, शिवराम जानबा कांबळे यांच्यापासून वैचारिक निबंधाला सुरुवात होते. ते नामदेव व्हटकरांच्यापर्यंत लेखनाचा प्रवास वाहत येतो. त्यामध्ये सत्यशोधक समाजातर्फे 'दीनबंधू' (१८७७), 'विटाळ विध्वंसक' (१८८८) यानंतरच्या काळात म्हणजे १९७० पासून पुढे शंकरराव खरात, गंगाधर पानतावणे, बाबुराव बागुल, केशव मेश्राम, अर्जुन डांगळे, कवी यशवंत मनोहर, जनार्दन वाघमारे, ना.रा. शेंडे, वसंत मून, प्रा. मा.क. गाजरे,

प्रा. रावसाहेब कसबे, रत्नाकर गणवीर, गोविंद गोरे इ. साहित्यिकांनी लेखन केल्याचे दिसून येते.

दलित वैचारिक निबंध लिहिणारे म.भि. चिटणीस प्रा. वा.ल. कुलकर्णी, प्रा. रा.भि. जोशी, प्रा. गं.बा. सरदार, सदा कऱ्हाडे, पु.ल. देशपांडे, प्र.श्री. नेरुरकर, रा.ग. जाधव, शरदचंद्र मुक्तिबोध ह्या दलितेतर मंडळींनीही वैचारिक निबंध लिहिले आहेत. य.दि. फडके दलितेतर पण दलित साहित्याची समीक्षा निकोप करणारे असे समीक्षक आहेत. त्यांची नोंद घ्यावी लागते.

रा.भि. जोशी, भालचंद्र फडके, मे.पु. रेगे, सदा कऱ्हाडे, गंगाधर पानतावणे, अर्जुन डांगळे, लक्षतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, बाळकृष्ण कवठेकर इ. ची नोंद समीक्षक म्हणून सर्व वैचारिक ललित निबंधकार व समीक्षकांनी मराठी दलित साहित्य विचारात मोलाची भर घातली आहे.

१९६० नंतर तत्कालीन सामाजिक समस्या, दलितांवरील अन्याय, अत्याचार, दलितांचे राजकारण, दलितांच्या वाङ्मयीन चळवळी, मराठी पारंपरिक साहित्य धर्मपरंपरावरील संताप इ. विषयावर बरेच वैचारिक लेखन झाल्याचे दिसून येते.

यावरून दलित साहित्याच्या वाटचालीचे स्वरुप लक्षात येते. दलित साहित्यातील कथा, कविता, नाटक, कादंबरी, आत्मकथा तसेच दलित वैचारिक लेखन यांचा थोडक्यात आढावा घेतला यावरून दलित साहित्याची वाटचाल कशी झाली आहे याचे दर्शन घडते. यावरूनच एकूण मराठी साहित्यातील दलित साहित्य हे किती मोलाचे ठरते हे दिसून येते.

## ४) 'समिधा' आणि आजचे दलित साहित्य :

दलित साहित्याच्या वाटचालीचे स्वरुप पाहताना 'समिधा' या कादंबरीचादेखील अभ्यास करणे गरजेचे वाटते. दलित साहित्य हे स्वातंत्र्यपूर्व काळात जरी उदयास आले असले तरी खऱ्या अर्थाने त्याची वाटचाल ही १९६० नंतर झाल्याची दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात दलित साहित्यामध्ये कथा, नाटक, कादंबरी व आत्मकथा या वाङ्मयप्रकारापेक्षा कविता हा वाङ्मय प्रकार जोमाने पुढे आल्याचा दिसून येतो. एकूण दलित साहित्यिकांनी आपल्या भाव-भावना व्यक्त करण्याकरीता 'कविता' हा वाङ्मय प्रकार स्वीकारला. दलित साहित्यामध्ये कादंबरी हा वाङ्मयप्रकार मर्यादित प्रमाणात हाताळला तर आत्मकथानांची संख्या दलित साहित्यात भरपूर प्रमाणात दिसून येते. नाटक आणि कथा ह्या काही प्रमाणात लिहिल्याचे जाणवते. दलित साहित्यामध्ये एकांकिका आणि तमाशा हे वाङ्मयप्रकारदेखील दिसून येतात.

महात्मा फुले यांनी जी प्रचलित समाजव्यवस्था आहे. तिच्याशी झुंज देऊ पाहणाऱ्या एका लढावू प्रवृत्तीचे चित्रण करण्याची परंपरा सुरू केली. त्यांनी समाजप्रबोधनासाठी आंदोलने व चळवळी केल्या. उक्ती आणि कृतीच्या माध्यमातून संघर्ष करण्याचा मूलमंत्र स्त्री-शूद्रादिकांच्या उध्दारासाठी, त्यांनी दिला. त्यांच्या काळात मात्र संपूर्ण दलित समाज जागृत होऊ शकला नाही. ब्राह्मणी समाजव्यवस्था नष्ट करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न यशस्वी होऊ शकले नाहीत. त्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबडेकरांच्या नेतृत्वाखाली महाडचा सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह मनुस्मृतीचे दहन, धर्मांतर यासारख्या चळवळी होताच संपूर्ण दलित समाज पेटून उठला. आंबेडकरांच्या प्रेरणेतून अशी सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक

आणि धार्मिक क्षेत्रांतील चळवळ सुरू झाली. त्याचप्रमाणे हळूहळू साहित्याचीही निर्मिती सुरू झाली. कथा, कविता आणि आत्मकथनांच्या तुलनेत दलित लेखकांनी कादंबरी हा वाङ्मय प्रकार मात्र अभावानेच हाताळल्याचे दिसून येते.

सुरूवातीच्या काळात ना.रा.शेंडे, अण्णाभाऊ साठे, ज.वि.पवार, बंधुमाधव मोडक, बाबुराव बागूल, शंकरराव खरात इत्यादींनी काही प्रमाणात कादंबरी लेखन केले. पण दलित कादंबरीने लक्ष वेधून घेतले ते अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांपासून त्यांनी बंडखोर, ध्येयनिष्ठ , बेडर आणि माणुसकी जपणारे नायक 'चित्रा', 'वारणेचा वाघ', 'फकिरा', आणि 'वैजयंता' यासारख्या कादंबऱ्यांमधून रंगवले. दलित समाजाचे वास्तव जीवन प्रत्ययकारकरित्या रेखाटण्याचा पहिला प्रयत्न अण्णाभाऊंनी केला. तर शंकरराव खरात यांनी दलित समाजाचे नागर आणि ग्रामीण पातळीवरचे जीवन विविध तसेच विपुल लेखनाने चित्रित केले आहे. बाबुराव बागूल हे देखील खरांताबरोबर आघाडीवर राहिले आहेत.

रणजित देसाई यांनी लिहिलेल्या 'समिधा' या कादंबरीचा विचार करताना शंकरराव खरात यांनी लिहिलेल्या सर्व कादंबऱ्या प्रकर्षाने नजरेसमोर येतात. 'माणुसकीची हाक', 'हातभट्टी', 'झोपडपट्टी', 'मी माझ्या गावाच्या शोधात', 'गावचा टिनोपॉल गुरूजी'इ. कादंबऱ्यांच्या शीर्षकावरून त्यातील आशयाची प्रचिती येते. खरातांच्या कादंबऱ्यामधून ग्रामीण भागातील सामाजिक जीवनातील कटू सत्याचे दर्शन होते. त्यामुळे या कादंबऱ्यांना विशेष स्थान आहे. खरातांनी दलित कादंबरीचा एक महत्त्वाचा टप्पा गाठल्याचे दिसून येते. १९८७ मध्ये प्रकाशित झालेली 'मी माझ्या गावाच्या शोधात' ही कादंबरी आणि रणजित देसाई

यांची 'समिधा' ही कादंबरी या दोन कादंबऱ्यांमध्ये विलक्षण साम्य असल्याचे दिसून येते.

परंपरा, जातिभेद, उच्चनीचता, अहंकार आणि अमानुषतेने सडलेल्या गावापासून मुक्त होऊन नव्या शोषणमुक्त गावाच्या शोधात निघालेला खरातांच्या कादंबरीतील नायक आनंदा हा तमाम दलितांचा प्रतिनिधी बनून सवर्णांच्या सर्वप्रकारच्या अन्याय, अत्याचाराविरूद्ध बंड थोपटतो. 'समिधा' या कादंबरीचा नायक 'तुका' हासुद्धा याच वाटेने जाणारा आहे. शंकरराव खरातांच्या कादंबऱ्यांची संख्यात्मक आणि गुणात्मक सरसता मान्य करूनही रणजित देसाईनी केलेला प्रयत्न निश्चितच स्तुत्य वाटतो. आशयाच्या दृष्टीने मात्र वि.स. खांडेकरांशी नाते सांगणारी कादंबरी म्हणून 'समिधा'चा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या निमित्ताने घडलेल्या घटना पाहिल्या तर दलितांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची प्रचिती येते. दलित समाजाकडे पाहण्याची सवर्णांची विकृत दृष्टी, दलित समाजातील एकजूट व समर्थ नेतृत्व यांचा अभाव, सवर्ण तसेच दलित समाजातील नेत्यांची समाजकारणापेक्षा राजकारणाला प्राधान्य देण्याची वृत्ती आणि सर्वच क्षेत्रात बोकाळलेला जातीयवाद यामुळे ही विषारी प्रवृत्ती टिकून राहिली आहे.

ग्रामीण भागातील दलितांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. कारण ग्रामीण भागातील दलितांना इच्छेविरूद्ध बलुतेदारीची कामे करावी लागतात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही दलितांना गुलामीचे आणि लाचारीचे जीवन जगायला हा सवर्ण समाज भाग पाडत आहे. घटनेने दिलेले सामाजिक तसेच राजकीय हक्क कागदापुरतेच लिहिले आहेत. कारण नव्या जाणिवांमुळे दलित समाज परंपरेने

चालत आलेली बलुतेदारीची कमे करण्यास नकार देताच दलित व सवर्ण यांच्यामध्ये संघर्ष निर्माण होतो. सवर्णीय हे दलितांच्यावर अन्याय करण्यात कधीही खंड पडू न देता तो अन्याय-अत्याचार पारंपरिक पिढीतून चालत असतो. परंतु ह्या अन्याय-अत्याचाराला विरोध करणाऱ्या दलित समाजाला कोणत्या संकटांना सामोरे जावे लागते याचे चित्रण 'समिधा' कादंबरीतून रणजित देसाई यांनी केले आहे.

## ४.१ 'समिधा' लेखनामागील प्रेरणा :

स्वातंत्र्योत्तर काळात दलित साहित्यामध्ये कादंबरी हा साहित्यप्रकार मर्यादित प्रमाणात हाताळल्याचे दिसून येते. त्यामध्ये दलित जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या कादंबऱ्या काही दलित तसेच दलितेतर लेखकांनीही लिहिल्याचे दिसून येते. दलित लेखकांनी दलित जाणिवेतून कादंबरी लेखन केले, तर दलितेतर लेखकांनी दलितांविषयी वाटणाऱ्या करुणेपोटी, सहानुभूतीतून कादंबरीलेखन केले.

रणजित देसाई हे दलितेतर लेखक जरी असले तरी ते स्वभावाने खूपच हळवे व संवेदनशील लेखक होते. म्हणूनच त्यांनी आपल्या जीवनात बेरडांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी 'बारी' (१९५९) ही पहिली कादंबरी लिहिली. परंतु अभ्यासकांनी या कादंबरीकडे म्हणावे तितके लक्ष दिले नाही. म्हणूनच देसाई यांनी दलितांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी 'समिधा' (१९७९) ही दुसरी कादंबरी लिहिली. ही कादंबरी आपण का लिहिली हे सांगताना देसाई या कादंबरीच्या प्रस्तावनेत आपले मनोगत व्यक्त करताना म्हणतात की, ''तीन वर्षापूर्वी एका शहरामध्ये हरिजनवाडा जाळला गेला. त्यात दोन माणस मृत्यूमुखी पडली. त्यानंतर अशा घटना अनेक गांवामधून घडत गेल्या. शेकडो वर्षे ज्या देशात संतांची शिकवण नांदते आहे ज्या

शिकवणुकीचा पुरस्कार आमच्या देशामध्ये आमच्या नेत्यांनी केला आहे, त्या देशात स्वातंत्र्य मिळाल्यानंतरसुद्धा पंचवीस वर्षांनी ह्या घटना का घडतात? का घडाव्यात ?

माझे गुरू कै. ती भाऊसाहेब खांडेकर यांच्यापुढे मी माझ्या मनातील व्यथा मांडली आणि त्यांनी मला ह्या प्रश्नावर विचार करण्याचा सल्ला दिला. ह्या नादामध्ये मी गावे फिरलो, तपशील गोळा केला आणि त्यातून जी कथा तयार झाली ती ही 'समिधा'. मी राजकारणी नाही, समाजप्रेमी असूनही त्याचा सखोल अभ्यास मला नाही, जे मी पाहिले, अनुभवले तेच या कादंबरीमध्ये मांडले आहे.''[३३]

लेखकाच्या या मनोगतावरून कादंबरी का लिहिली त्यामागची प्रेरणा काय होती याचे दर्शन घडते. 'समिधा' ही एक घटनाप्रधान कादंबरी देसाई यांच्या हातून लिहून झाली.

## ४.२ 'समिधा' चे आजच्या दलित साहित्यातील स्थान :

आजच्या दलित साहित्यातील 'समिधा' या कादंबरीचे स्थान पाहताना रणजित देसाई यांच्या लेखनातील गुण आणि मर्यादांची जाणीव झाल्याशिवाय राहत नाही. दलित कादंबरीकारांनी प्रकट केलेल्या वास्तवजीवनाला अनुभूतीची जोड लाभल्यामुळे त्याची परिणामकारकता वाढणे स्वाभाविक आहे. यावरून रणजित देसाई यांच्या लेखनावर असणारा फडके-खांडेकर यांच्या लेखनाचा प्रभाव तसेच उपरेपणा दिसून येतो. तरीही दलितांकडे पाहण्याची प्रामाणिक व प्रांजळ दृष्टी त्यांच्या स्वभावातून दिसून येते.

प्रा. जी.पी. माळी या कादंबरीबाबत म्हणतात की, ''वाङ्मयीन गुणवत्तेच्या दृष्टीने ही कादंबरी बऱ्याच उणिवांनी युक्त असली तरी सामाजिक सहानुभूतीच्या

अंगाने पाहता, ही कादंबरी दुर्लक्षित करण्याजोगी नाही. ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.''[३३] अभ्यासकांनी दलितांच्या जीवनावर आधारित कलाकृती यादृष्टीने 'समिधा' या कादंबरीकडे आत्मीयतेने व गांभीर्याने पाहिले नाही. परंतु डॉ. माळी यांनी रणजित देसाई यांच्या संवेदनशील मनात दलित समाजाविषयी सहानुभूतीची भावना असल्याचे मत प्रकट केले आहे.

रणजित देसाई यांनी त्या काळातील दलित समाजाचे वास्तव जीवन 'समिधा' कादंबरीतून रेखाटले आहे. या कादंबरीतून दलित आणि सवर्ण यांच्यातील संघर्षाचे चित्रण अगदी वास्तवपूर्णरित्या रेखाटण्याचा आटोकाट प्रयत्न त्यांनी केल्याचा दिसून येतो. 'समिधा' कादंबरीविषयी काही अभ्यासकांनी आपली मते व्यक्त केली आहेत. त्यापैकी द.ता. भोसले लिहितात की, ''जागृत दलित समाजाचे, हक्क आणि माणुसकीसाठी सुरु झालेला लढा या कादंबरीचा विशेष आहे. आजच्या परिस्थितीत हा लढा पराभूत झालेला दाखविला असला तरी या पराभवातही उद्याच्या भविष्याची स्वप्ने दडलेली आहेत. याची जाणीव कादंबरी वाचून होते.''[३४] यावरून असे दिसून येते की, दलित तरूण पिढी संघर्ष करून स्वतंत्रपणे जीवन जगन्याचा प्रयत्न करत आहे आणि त्याचा पाया म्हणजे ही 'समिधा' होय.

यावरून 'समिधा' या कादंबरीचे आजच्या दलित साहित्यातील स्थान लक्षात येते.

**समारोप :**

दलित साहित्य हे स्वातंत्र्यपूर्व काळात जरी उदयास आले असले तरी त्याचा विकास मात्र १९६० नंतरच झाल्याचा दिसून येतो. दलित साहित्याचा अभ्यास

करताना त्याचा उद्‌गम आणि विकास कसा होत गेला याचा थोडक्यात आढावा घेतला. आजचे दलित साहित्य आणि 'समिधा' या कांदबरीचा अभ्यास करण्यापूर्वी 'समिधा' या शब्दाचा अर्थ समजावून घेणे गरजेचे वाटते.

आजचे दलित साहित्य अभ्यासताना 'दलित' शब्दाचा अर्थ, व्याख्या तसेच दलित साहित्याच्या व्याख्या, स्वरुप व वैशिष्ट्ये काय आहेत हे पाहिल्यानंतर दलित साहित्याची वाटचाल कशी होत गेली हे पाहिले. त्या वाटचालीमध्ये कथा, कविता, नाटक, कांदबरी, आत्मकथने व वैचारिक वाङ्‌मय हे पाहिले. यावरून एकूण मराठी साहित्यामध्ये दलित साहित्याने आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केल्याचे दिसून येते.

या दलित साहित्यामध्ये रणजित देसाई यांच्या दलितांच्या जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या 'समिधा' ह्या कादंबरीने मोलाचे स्थान पटकावले आहे. या कादंबरीतून लेखकाने दलित-सवर्ण संघर्षाचे चित्रण करून तत्कालीन दलित समाजाचे वास्तव जीवन दर्शविले आहे. यावरून आजच्या दलित साहित्यामध्ये 'समिधा'चे स्थान मोलाचे ठरले आहे.

-----

## संदर्भ ग्रंथ सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १) | आपटे, वासुदेव गोविंद | : | 'मराठी शब्द रत्नाकर', प्रकाशक - हनुमंत अनंत भात्वे, सहावी आवृत्ती, १९८९, पृ.क्र. ५१. |
| २) | जोशी, प्र.न. | : | 'आदर्श मराठी शब्दकोश', प्रकाशक - विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९८२, पृ.क्र. १२६२. |
| ३) | कै. भिडे, वि.वा. | : | 'सरस्वती शब्दकोश', प्रकाशक - व.ग. देवकुळे, व्यवस्थापक - चित्रशाळा प्रेस, पुणे, दुसरी आवृत्ती, १९७०. |
| ४) | नवलक्षी श्री. | : | 'नालन्दा विशाल शब्दसागर', प्रकाशक - आदीश बुक डेपो, दिल्ली, प्रकाशन-१९८८, पृ.क्र. १४१०. |
| ५) | वर्मा, रामचंद्र | : | 'प्रामाणिक हिन्दी शब्दकोश', प्रकाशन - साहित्य रत्नामाला कार्यालय, बनारस, प्रकाशन - २००७, पृ.क्र. ११००. |
| ६) | | : | 'मोल्सवर्थकृत मराठी-इंग्रजी शब्दकोश', प्रकाशक शरद गोगटे, शुभदा सरस्वत, पुणे, दु.आ. १८५७, पृ.क्र. ४२६. |
| ७) | बागुल, बाबुराव | : | 'दलितसाहित्य संमेलन', नागपूर, उद्घाटनाचे भाषण, १९७६. |

८) जोशी, लक्षतीर्थ लक्ष्मणशास्त्री : 'निकाय', सप्टें.-आक्टोबर, १९७६.

९) मेश्राम, केशव : 'लोकराज्य', दि. १९७९.

१०) ढसाळ, नामदेव : 'आम्ही', दिवाळी अंक, १९७६.

११) डॉ. कऱ्हाडे, सदा : 'दलित साहित्याच्या निमित्ताने', सत्यकथा, जुलै, १९७०.

१२) वानखेडे, म.ना. : 'सूड कादंबरीची प्रस्तावना', बाबुराव बागुल, अभिनव प्रकाशन, प्रथम आवृत्ती, १९७०.

१३) बागुल, बाबुराव : 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', मार्च-एप्रिल, १९७१, पृ.क्र. ३४.

१४) सरदेशमुख, त्र्य.वि. : 'अस्मितादर्श', दिवाळी अंक, १९७७,पृ.क्र. ६.

१५) मेश्राम, केशव : 'दलित लेखकांचे पहिले संमेलन',मुंबई,१९५८.

१६) मुक्तिबोध, शरदचन्द्र : 'साहित्य सिंहगर्जना', जानेवारी, १९७६.

१७) नेरुरकर, प.श्री. : 'मायमराठी', ऑक्टोबर, १९७५, पृ.क्र. २८.

१८) चिटणीस, म.भि. : 'अस्मितादर्श', मेळावा, औरंगाबाद येथील भाषणातून उद्‌धृत.

१९) डॉ.ग्रामोपाध्ये गं.बा. : 'सत्यकथा', जुलै, १९७३, पृ.क्र. ७२.

२०) डॉ.पानतावणे,गंगाधर : 'मागोवा', १९७३, पृ.क्र. ८०.

२१) ढाले, राजा : 'नाकेबंदी' (प्रस्तावना), जयमाला प्रकाशन, मुंबई, १९७६.

२२) वानखेडे, म.ना. : 'अध्यक्षीय भाषणातून उद्धृत'.

२३) कुरुंदकर, नरहर : 'निकाय', एप्रिल, १९७६, पृ.क्र. ५९.

२४) बागुल, बाबुराव : 'दलित साहित्य : आजचे क्रांतीविज्ञान', उद्दिष्ट प्रकाशन, नागपूर, १९८१.

२५) डॉ. जाधव, शत्रुघ्न : 'दलित समीक्षेचे स्वरुप', प्रतिभास प्रकाशन, परभणी, प्रथमावृत्ती मे, २००३, पृ.क्र. २६.

२६) डॉ. कऱ्हाडे, सदा : 'दलित साहित्य चिकित्सा',

प्रकाशिका सौ. उषा मुलाटे, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जून, २००१,पृ.क्र.९६.

२७) डॉ. जाधव, शत्रुघ्न : 'उनि.', पृ.क्र. २८.

२८) खरात, प्रकाश : 'दलित कथा : उगम आणि विकास',पृ.क्र.२२.

२९) डॉ. कऱ्हाडे, सदा : 'उनि. पृ.क्र. ९९. '

३०) चिटणीस, म.भि. : 'दलित रंगभूमी', संपादक भालचंद्र फडके (प्रस्तावना) पृ.क्र. १.

३१) डॉ. जाधव, शत्रुघ्न : उनि, पृ.क्र. ३०, ३१.

३२) देसाई, रणजित : ‘समिधा’, (प्रस्तावना), अजब पुस्तकालय, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, ३ मार्च, १९७९.

३३) डॉ. माळी, जी.पी. : ‘रणजित देसाई : जीवन आणि साहित्य’, शब्दवेल प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, ८ एप्रिल, २००१, पृ.क्र. १०७.

३४) भोसले द.ता. : ‘विशाखा’, एप्रिल, १९८८, पृ.क्र. ८.

----